# प्रकरण चार

## वित्त विभाग

**4.514 रजा प्रवास सवलत देयकातील अनियमितता.**

**पंचायत समिती धुळे, जिल्हा धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 33) -** सदरबाबत 18 प्रमाणकांन्वये रक्कम रुपये 1,44,740/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलतीचा लाभ प्रदान करतांना वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रप्रस-119/प्र.क्र.11 सेवा-5, दिनांक 10/06/2015 नुसार प्रवास कालावधीतील तिकिटे रजा प्रवास सवलत देयकासोबत सादर करणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) प्रमाणक क्रमांक 55 नुसार श्री. भालचंद्र चित्ते यांना प्रवास सवलत प्रदान करण्यात आलेली आहे. परंतु, सदर प्रमाणकासोबत जोडलेल्या मंजूरी आदेशावर दिनांक नमुद नाही. कर्मचाऱ्यांना रजा प्रवास सवलतीचा लाभ प्रदान करतांना महाराष्ट्र शासनप वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक रप्रस-119/प्र.क्र.11 सेवा-5, दिनांक 10/06/2015 नुसार जाण्याचे ठिकाण आधी घोषित करुन सक्षम अधिकाऱ्यांची मंजूरी घेणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

अनुक्रमांक 1 ते 13,15,17 यांचे प्रवासाचे तिकिट देयकासोबत उपलब्ध झालले नाही. त्यामुळे सदर देयकाची प्रदान रक्कम रुपये 1,15,668/- संबंधितांकडून वसूल करण्यात यावी.

**4.515 पंचायत समिती उपकरातून मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानाने ताडपत्री पुरवठा योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती साक्री, जिल्हा धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती उपकरातुन 100 टक्के अनुदानाने शेतक-यांना ताडपत्री वाटप करणे योजनेतंर्गत प्रमाणक क्रमांक 28, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 2,65,437/- खर्च नोंदविणेत आला आहे. याबाबत खालील अभिप्राय नमुद करण्यात येत आहे.

1) सदर योजनेस पंचायत समिती सर्वसाधारण सभा दिनांक 10/06/2015, ठराव क्रमांक 49 अन्वये तरतुद रुपये 2,50,000/- मंजुर करण्यात आलेली आहे. तथापि, सदर योजनेवर रुपये 2,65,437/- खर्च करण्यात आलेला आहे. पुनर्विनियोजनाशिवाय जादा केलेला खर्च रुपये 15,437/- लेखापरीक्षणास अमान्य करण्यात येत आहे.

2) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 5 नुसार मालाचा विहित मुदतीत पुरवठा न केल्यास प्रतिदिन रूपये 100/- रुपये प्रमाणे दंड वसुल करणे आवश्यक आहे. त्यानुसार रुपये 500/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

3) आयकर अधिनियम 1961 अन्वये प्रदानावर रुपये 5,840/- कपात केलेला नाही. सदर रक्कम वसुल करून अनुपालन दर्शवावे.

4) लाभार्थी प्रस्तावांची पडताळणी केली असता खालील अनियमितता आढळुन येतात.

| | |
|---|---|
| अ) श्री जितेश भाउराव बहिरम | उत्पन्न व दारिद्रय रेषा दाखला नाही. |
| ब) श्री. काळु जंगलु भिल | उत्पन्न व दारिद्रय रेषा दाखला नाही. |
| क) श्री. परसराम मोतीराम भोये | उत्पन्न व दारिद्रय रेषा दाखला नाही. |
| ड) श्री. देसाई नुराजी निंबा | नमुना 7-12 क्र. 31 नुसार क्षेत्र 6.48 हेक्टर |
| इ) श्री मंगळया काशिनाथ पिंपळे | भुमापन क्रमांक 5-1 नुसार क्षेत्र 3.50 हेक्टर व भुमापन क्रमांक 18/1 नुसार क्षेत्र 2.00 |

योजनेचा अटीनुसार उपरोक्त लाभार्थीकडे उत्पन्न व दारिद्रय रेषा दाखला व कमाल 3 हेक्टर जमिनधारणा असणे आवश्यक आहे. याबाबत पुर्तता दर्शवावी. तोवर रक्कम रुपये 16,385/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

**4.516 विलंबाने प्रदान करण्यात आलेल्या सेवानिवृत्ती लाभावरील व्याजाची रक्कम उपकरातून प्रदान केलेबाबत.**

**पंचायत समिती साक्री, जिल्हा धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** श्री रमेश जगन्नाथ बाविस्कर, सेवानिवृत्त वरिष्ठ सहाय्यक यांना सेवानिवृत्ती वेतन विषयक लाभ विलबांने प्रदान केल्यामुळे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचे आदेश क्रमांक साप्रवि आस्था 29/471/2015 दिनांक 15/09/2015 व महाराष्ट्र शासन, राजपत्र, वित्त विभाग, दिनांक 01/03/2011 अधिसुचनेनुसार भविष्य निर्वाह निधी व्याजदर 8 टक्केप्रमाणे व्याजाची रक्कम प्रमाणक क्रमांक 16, दिनांक 18/11/2015 रुपये 54,571/- अन्वये पंचायत समिती उपकरातुन प्रदान करण्यात आलेली आहे. याबाबत खालील अभिप्राय नमुद करण्यात येत आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांचे आदेशान्वये सदर विलंबास तत्कालीन वरिष्ठ सहाय्यक, श्री.एस.के.पाटील यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात आल्याने, त्याचेकडुन रक्कम वसुली करणे आवश्यक असतांना अद्याप वसुली करण्यात आलेली नाही.

2) सदर आदेशानुसार श्री. बाविस्कर यांना वेतन व भत्ते प्रदान करण्यात येणा-या समर्पक लेखाशिर्षातुन व्याजाची रक्कम प्रदान करणे आवश्यक असतांना नियमबाह्यरित्या उपकरातुन प्रदान करण्यात आलेली आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम 1961, नियम 100, अनुसुची 1 प्रमाणे व्याजाची रक्कम प्रदान करण्यास मान्यता नसतांना सदरचा खर्च करण्यात आलेला आहे.

सदर प्रदानाची रक्कम सत्त्वर वसुल करुन पंचायत समिती निधीत जमा करण्यात यावे.

**4.517 झेरॉक्स देयक प्रदानातील अनियमितता.**

**पंचायत समिती शिंदखेडा, जिल्हा धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समितीने झेरॉक्सची देयके पारित केलेली असुन रक्कम रुपये 77,808/- खर्च नोदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1) पारित करण्यात आलेल्या बहुतांशी उपप्रमाणके व प्रमाणकांवर काय झेरॉक्स केले याबाबत तपशिल नोंदविलेला नाही.

2) प्रत्येक विभागाकडील झेरॉक्सची देयके पाहता खुप मोठया प्रमाणावर झेरॉक्ससाठी खर्च करण्यात आलेला आहे. तसेच सदर बाबींची आवश्यकता व इतर आवश्यक बाबी / अभिलेख प्रमाणकांसोबत जोडण्यात आलेले नाहीत. त्याअभावी खर्च रकमेच्या योग्यतेची पडताळणी करता आलेली नाही.

3) झेरॉक्ससाठी एवढया मोठया प्रमाणावर खर्च करावा लागत असल्याने पंचायत समितीने दरपत्रके मागवुन वाजवी दराने झेरॉक्ससाठी दरपत्रके मंजुरी करुन न्युनतम दराच्या दरपत्रकदाराला कामाचा आदेश देणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) झेरॉक्स देयके ही सर्वसाधारण रुपये 2/- प्रती प्रत याप्रमाणे पारीत करण्यात आलेली आढळुन आली आहेत. सदर दर खुप जास्त असुन झेरॉक्स साधारण रुपये 1/- प्रती प्रत या दराने बाजारभाव प्रचलित असतांना रुपये 2/- प्रती प्रत दराने देयके पारीत करण्याबाबत खुलासा सादर करावा.

5) उपरोक्त प्रमाणे दुप्पट दराने देयके पारीत केल्याने पंचायत समितीचे आर्थिक नुकसान झालेले असुन दुकानदाराचे हित जोपासण्यात आलेले आहे. तरी याबाबत चौकशी करण्यात येवुन संबंधीतांबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

6) अवाजवी दराने देयके पारीत केल्याने सदर झेरॉक्स वरील खर्च रकक़म लेखापरीक्षणास मान्य नाही.

**4.518 पंचायत समिती उपकर निधीबाबत.**

**पंचायत समिती जत, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती जतला सन 2015-2016 मध्ये खालीलप्रमाणे वाढीव उपकर, उपकरावर प्रोत्साहनपर अनुदानापोटी एकुण रक्कम रुपये 37,11,661/- अनुदान प्राप्त झाले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 च्या कलम 155(4) नुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून महाराष्ट्र शासनाने जिल्हापरिषदेच्या अधिकारक्षेत्रातील संपूर्ण जिल्हयात प्रत्येक महसुलाच्या प्रत्येक रूपया मागे किती वाढीव दर आकारावयाचे याचा खुलासा करावा. व प्राप्त झालेल उपकर अनुदान कोणत्या दराप्रमाणे प्राप्त झाले आहे. याबाबत संबंधित कागदपत्रे सादर करून खात्री पटवावी.

2) प्राप्त उपकर निधीबाबत स्वतंत्र नोंदवही ठेवून उपकर निधीच्या नोंदी घेऊन किती रक्कम येणे प्रलंबित आहे, त्याचा तपशिल नमूद करावा. तसेच येणे रक्कमेबाबत मा. जिल्हाधिकारी, सांगली कार्यालयाशी संपर्क साधून त्वरीत मागणी करावी.

**4.519 कुटुंब निवृत्ती वेतन जादा अदाईबाबत.**

**पंचायत समिती उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती उत्तर सोलापूर यांचेकडील 2015-2016 च्या लेखापरीक्षण वेळी कुंटुंबनिवृत्ती वेतन प्रकरणे तपासणी केली असता श्रीमती मिराबाई भिमराव साठे यांना माहे जाने 2016 ते माहे जून 2016 अखेर रुपये 46,281/- व श्रीमती भिमाबाई लक्ष्मण पवार यांना माहे जून 2014 माहे ते जून 2016 अखेर रुपये 94,606/- चे जादा कुंटुंब निवृत्ती वेतन जादा आदाई झाली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कै.भिमराव त्रिंबक साठे, मयत (दिनांक 18/01/2006 उपशिक्षक यांचे पत्नी श्रीमती मिरा भिमराव साठे यांना वरिष्ठ लेखाधिकारी -1 जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडील आदेश क्रमांक जिपसो अर्थ मिवे / 259/10, दिनांक 19/05/2010 अन्वये कुटुंब निवृत्ती वेतन मंजूर करण्यात आलेले आहे. पी.पी.ओ.प्रमाणे त्यांना दिनांक 18/01/2016 पर्यंत पूर्ण दराने व तद्नंतर कमी दराने कुटुंब निवृत्तीवेतन देय असताना, जानेवारी 2016 ते जून 2016 या कालावधीमध्ये एकूण मुळ निवृत्ती वेतन रूपये 31,842/- + एकूण महागाई भत्ता रूपये 37,572/- = रूपये 69,414/- देय असताना एकूण मुळ निवृत्तीवेतन रूपये 53,070/- + एकूण महागाई भत्ता रूपये 62,625 = रूपये 1,15,695/- अदा केल्याने रक्कम रूपये 46,281/- इतकी जादा अदाई झालेली आहे. तरी सदरची जादा अदाईची रक्कम कुटुंब निवृत्तीवेतन धारकाकडून वसूल करावी.

2) कै.लक्ष्मण रतन पवार, मयत परिचर यांचे पत्नी श्रीमती भिमाबाई लक्ष्मण पवार यांना वरिष्ठ लेखाधिकारी -1 जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडील आदेश क्रमांक जिपसो/अर्थ/निवे/570/10, दिनांक 23/04/2010 अन्वये कुटुंबनिवृत्ती वेतन मंजूर करण्यात आलेले आहे. पी.पी.ओ. प्रमाणे त्यांना दिनांक 31/05/2014 पर्यंत पूर्ण दराने व तद्नंतर कमी दराने कुटुंब निवृत्तीवेतन देय असताना, जून 2014 मे जून 2016 या कालावधीमध्ये एकूण मूळ निवृत्ती वेतन रूपये 66,825/- + एकूण महागाई भत्ता रूपये 76,125/- = एकूण रूपये 1,42,950/- देय असतना एकूण मुळ निवृत्ती वेतन रूपये 1,11,050/- + महागाई भत्ता रूपये 1,26,506/- = रूपये 2,37,556/- अदा केल्याने रक्कम रूपये 94,606/- इतकी जादा अदाई झालेली आहे. तरी सदरची जादा अदाईची रक्कम कुटुंब निवृत्तीवेतन धारकाकडून वसूल करावी.

**4.520 ठेव नोंदवही व ठेव रक्कमेबाबत.**

**पंचायत समिती बार्शी, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती बार्शी यांचेकडील सन 2015-2016 चे लेखापरीक्षण कालावधीत ठेव नोंदवही तपासणी केली असता दिनांक 31/03/2016 अखेर ठेव खाती खालील प्रमाणे नमूद केलेनुसार रक्कमा पंचायत समितीकडे बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित व शिल्लक असल्याचे आढळून आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र लेखासंहिता 1968 मधील नियम 218 नुसार ठेवीच्या लेखाशीर्षाखाली जमा करण्यात येणार नाहीत अशा रकमांचा तपशिल नमुद करण्यात आलेला आहे. त्यात प्रामुख्याने महसुली शीर्षाखाली ज्यांची नोंद करणे स्पष्टपणे शक्य असेल अशा रकमांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतू पंचायत समिती बार्शी यांचेकडील ठेव नोंदवहीची पडताळणी केली असता पंचायत समितीकडे ब-याच प्रमाणात महसुली जमा ठेव खाती ठेवण्यात आलेल्या

आहेत. तरी रक्कम रुपये 1,23,41,946/- योग्य त्या लेखाशिर्षाखाली व्याजासहित शासन निधीत जमा करणे आवश्यक आहे.

1) ठेव नोंदवहीची तपासणी केली असता जिल्हा निधी कडील सन 2012-13 ते 2015-16 या कालावधीतील एकूण थकीत ठेवी रक्कम रुपये 80,11,845/- दिनांक 31/03/2016 अखेर शिल्लक असून सदर बाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 219 नुसार सन 2012-13 ते 2015-16 या कालावधीतील तीन वर्षावरील सर्व थकीत ठेव रक्कमा व्यपगत करुन योग्य त्या लेखा शिर्षाखाली जमा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही करणेत आलेली नाही. तरी सदरचे अनियमिततेबाबत योग्य तो खुलासा सादर करावा व उपरोक्त नमुद केलेनुसार तीन वर्षांवरील थकीत ठेव रकमा (शासन निधी वगळून) व्यपगत करुन योग्य त्या लेखा शिर्षाखाली जमा केलेची पुर्तता दाखविणे आवश्यक आहे.

2) तसेच ठेव नोंदवहीची तपासणी केली असता अभिकरण निधी कडील सन 2012-13 ते 2015-16 या कालावधीतील एकूण थकीत ठेवी रक्कम रुपये 9,41,297/- दिनांक 31/03/2016 अखेर शिल्लक असल्याचे आढळुन आलेले आहे. तसेच जिल्हा परिषद सेस निधीचे खातेवरील सन 2012-13 ते 2015-16 या कालावधीतील एकूण थकीत ठेवी रक्कम रुपये 84,08,574/- दिनांक 31/03/2016 अखेर शिल्लक असल्याचे आढळुन आलेले आहे. सदर बाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 219 नुसार सन 2012-13 ते 2015-16 या कालावधीतील तीन वर्षावरील सर्व थकीत ठेव रक्कमा व्यपगत करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही करणेत आलेली नाही. तरी सदरचे अनियमिततेबाबत योग्य तो खुलासा सादर करावा व उपरोक्त नमुद केलेनुसार तीन वर्षांवरील थकीत ठेव रकमा (शासन निधी वगळून) व्यपगत करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली जमा केलेची पुर्तता दाखविणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 219 नुसार वर्षाच्या अखेरीची ठेवीची कोणतीही रक्कम ती परत देय झाल्याच्या तारखेपासून तीन वर्षे मुदतीपर्यंत हक्क न सांगता राहिली असेल तर महसुली लेखाशीर्षाखाली जमा करण्यात येईल. परंतू अशी जमा करण्यात आलेल्या ठेवी, स्थायी समितीच्या मंजूरीशिवाय परत देण्यात येणार नाहीत. याबाबत नियमानुसार कार्यवाही केलेची पुर्तता दाखविणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 220 नुसार दरवर्षी 15 मे रोजी तीन वर्षाहून अधिक कालावधीच्या व्यपगत न केलेल्या प्रलंबित ठेवी आणि 31 मार्च रोजी संपणा-या वर्षाच्या अखेरीस 1 वर्षापेक्षा जुन्या व प्रलंबित रकमाच्या बाबी त्या प्रलंबित राहील्याचे तपशिलवार कारण दर्शविणारे मागील वर्षाचे विवरणपत्र सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सोलापूर यांना पाठविणे आवश्यक होते. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. सदरचे अनियमिततेबाबत पुर्तता दाखविणे आवश्यक आहे.

**4.521 निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतनाच्या प्रदानामधील त्रुटींबाबत.**

**पंचायत समिती अक्कलकोट, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 32) -** पंचायत समिती अक्कलकोट यांच्या सन 2015-2016 च्या लेखापरिक्षणा दरम्यान अेपीपी-9 ची तपासणीबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 9 निवृत्तीवेतनधारक व कुटूंब निवृत्तीवेतनधारक यांना महागाई भत्ता अदा करण्यात येत नाही. याबाबत कोणताही खुलासा करण्यात आलेला नाही.

2) खालील निवृत्तीवेतन / कुटूंब निवृत्तीवेतनधारक यांना अतिप्रदान झालेले आहे.

अ) श्रीमती शालन शा. कांबळे यांना अतिप्रदानीत रक्कम रुपये 11,670/- वसुल करण्यात यावे.

ब) श्रीमती रजियाबेगम न. शिरवळ कुनिवे यांना अतिप्रदानीत रक्कम रूपये 36,288/- वसुल करण्यात यावी.

क) श्रीमती छायाबाई ग. निंबाळ कुनिवे यांना रक्कम रूपये 4,377/- कमी प्रदान करण्यात येत आहे.

ड) श्रीमती सुमती सुहासराव बल्लाळ यांना रक्कम रुपये 5,87,869/- इतकी वसुल करण्यात यावी.

इ) श्री. रामचंद्र हनमंत कामाठी यांना अतिप्रदान रुपये 5,64,402/- इतकी वसुल करण्यात यावी.

ई) श्रीमती रूक्मीनी बिराजदार यांना रुपये 4,75,702/- इतकी वसुल करण्यात यावी.

3) निवृत्तीवेतन / कुटूंब निवृत्तीवेतन विभागात खालील प्रमाणे सर्वसाधारण त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

अ) निवृत्तीवेतन प्रदान नोंदवही नमूना - एपीपी-9 मध्ये निवृत्तीवेतनधारकाचा संपूर्ण तपशिल, दिनांक, अंशराशीकरणाची रक्कम, अंशराशीकरणाची तारीख, सुधारीत निवृत्ती वेतन निश्चितीची नोंद, इत्यादी नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

ब) प्रदान करण्यात येणाऱ्या रक्कमांची प्रत्येक महिन्यात नोंद घेण्यात आलेली नाही. माहे जूलै, 2016 नंतरच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

क) पाचव्या वेतन आयोगाच्या निवृत्तीवेतनाच्या दराची नोंद नसल्यामुळे सहाव्या वेतनआयोगानुसार सुधारीत केलेल्या निवृत्ती वेतन दराची खात्री करता आलेली नाही.

ड) सर्व निवृत्ती वेतन / कुटूंब निवृत्तीवेतन धारकांचे दरवर्षी हयातीचे दाखले घेवून त्याची नोंद एपीपी-9 ला घेणे आवश्यक असताना सन 2012-13 पासून तशा नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत.

इ) ज्या निवृत्तीवेतन / कुटूंब निवृत्तीवेतनधारकांचा मृत्यू झालेला आहे अशा निवृत्ती वेतन / कुटुंब निवृत्ती वेतनधारकांचे निवृत्तीवेतन प्रदान आदेश (PPO), मुख्य वित्त व लेखा अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांना परत पाठविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**4.522 रोखपुस्तकामध्ये बँक शिल्लकेपेक्षा अधिक रकमेचे असंवितरीत धनादेश असलेबाबत.**

**पंचायत समिती गेवराई, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 57 अन्वये दर महिन्याचे अखेरचे दिवशी रोख वहीतील शिल्लक व बँकेतील शिल्लक याचा ताळमेळ घेवुन फरकाचे विवरण तयार करुन येणारा फरक काढुन टाकण्यासाठी सत्वर प्रभावी उपाय योजना करणे आवश्यक असताना पंचायत समितीने जिल्हा निधीच्या एसबीएच खात्याच्या बँक शिल्लक व रोख वही शिल्लकेच्या फरका बाबत उपाय योजना केलेली नाही.

पंचायत समितीने ठेवलेल्या नमुना नं.7 (कॅशबुक) मध्ये वर्षाअखेर गोषवारा काढत असताना न वटलेल्या धनादेशाच्या रकमा उणे दाखविण्यात आल्या आहेत. (उदा.हस्तांतरित योजना (-) 67058423). सदरबाब नियमबाहय आहे.

पंचायत समितीच्या जिल्हा निधीमध्ये असंवितरीत धनादेशाची रक्कम रुपये 8,70,17,711/- अशी असुन संबंधीत निधीची बँक शिल्लक रक्कम रुपये 7,36,67,976/- आहे. यावरुन बँक शिल्लकेपेक्षा असंवितरीत धनादेशाची रक्कम रुपये 1,33,49,735/- ने अधिक आहे. यावरुन संबंधीत पंचायत समितीने जिल्हा निधीमधुन जमेपेक्षा अधिक खर्च केलेला आहे. तसेच उपरोक्त सर्व धनादेश वटल्यास सदर निधीचे खाते उणे मध्ये होईल.

**4.523 ग्रामपंचायत कर्मचारी किमान वेतन प्रतिपूर्ती खर्चासाठी देय अनुदान वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती शिरुर, जिल्हा बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 74,28,100/- खर्च करण्यात आला आहे. यावर खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक 2012/प्र.क्र.235/पंरा-3, दिनांक 04/03/2014 नुसार ग्रामपंचायत कर्माचा-यांना किमान वेतन वाटप करण्यापूर्वी ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न विचारात घेऊन मानधन वितरीत करावयाचे आहे. उपरोक्त शासन निर्णयानुसार रुपये 2.00 लक्ष पर्यंत उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना 100 टक्के शासन हिस्सा अनुज्ञेय आहे, रुपये 2.00 लक्ष ते 5.00 लक्ष पर्यंत उत्पन्न असणा-या ग्रामपंचायतींना 75 टक्के शासन हिस्सा अनुज्ञेय आहे व उर्वरित सर्व ग्रामपंचायतींना 50 टक्के प्रमाणे शासन हिस्सा अनुज्ञेय आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही न करता पंचायत समितीने जादा प्रदान केलेले आहे. जादा अदाईची रक्कम रुपये 32,43,825/- वसुलपात्र ठरते.

2) शासन निर्णयानुसार ग्रामपंचायतीने प्रथम 100 टक्के वेतनाची अदाई करुन नंतरच प्रदानाचे वाटपपत्राची नमुना नं.24 ची सत्य प्रतिद्वारे पंचायत समितीकडे मागणी करावयाची अशी वाटपपत्रे वाटप झाल्यानंतर वरील शासन निर्णय दिनांक 05/08/2008 नुसार तपासणी करुन नोकर पगार योग्य प्रकारे वाटप झाल्याची सत्यता गटविकास अधिकारी यांनी पडताळून 50 टक्के शासन हिश्श्याच्या अनुदानाची मागणी करणे आवश्यक असून त्याप्रमाणे प्रतीपुर्ती 100 टक्के रक्कमेची खात्री करावयाची आहे. असे असताना तशी कार्यवाही झालेली नाही.

3) सदर रक्कमा ग्रामपंचायतींना प्राप्त झाल्याबाबतची नमुना नं.7 पोचपावत्या घेतलेल्या नाहीत.

4) पंचायत समितीचे प्रतीपुर्ती व उपयोगिता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध केले नाही.

**4.524 मुदत ठेव रक्कम गुंतवणूक व्याज नुकसानीबाबत.**

**पंचायत समिती उमरगा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती उमरगा जिल्हा उस्मानाबादव्दारा बँक ऑफ इंडीया शाखा उमरगा येथे मुदत ठेव क्रमांक 118944537 व खाते क्रमांक 64310110003105 मध्ये रूपये 1,00,00,000/- गुंतवणुक दिनांक 12/12/2011 रोजी करण्यात आली. सदर गुंतवणुकीचा कालावधी 111 दिवस असुन व्याज दर 7.50 टक्के एवढा होता. सदर गुंतवणुकीचे रोखीकरण दिनांक 08/10/2013 रोजी करण्यात आले व मुळ रक्कम रूपये 1.00 कोटी जमा दर्शवुन व्याजाची रक्कम रूपये 9,10,190/- मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे धनाकर्षाव्दारे पाठविल्याचे निदर्शनास आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरच्या गुंतवणुकीवरील वार्षिक 7.5 टक्के दराने व्याजाची परिगणना 13,53,082/- येत असतांना बँक ऑफ इंडीयाव्दारा रुपये 9,10,712/- व्याज प्रदान करण्यात आले. त्यामुळे व्याजाचे रुपये 4,42,370/- नुकसान झाले याबाबत जबाबदारी निश्चित करावी.

2) सद्दस्थितीत सदर खात्यामध्ये 7,633/- रूपये जमा असुन सदर खाते बंद करून रक्कम हस्तांतरीत योजना खाती जमा घेणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 222 नमुना क्रमांक 84 मध्ये गुंतवणुक नोंदवही ठेवलेली नाही.

**4.525 आयकर कपातीच्या रक्कमेचे धनादेश शासन खाती जमा न करणेबाबत.**

**पंचायत समिती वाशी, जिल्हा उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3)** - पंचायत समिती, वाशी सन 2015-2016 चे लेखापरिक्षणात तालुका आरोग्य कार्यालय वाशी अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, पारगांव यांनी 3 वेतन प्रमाणकातुन आयकर रक्कम रुपये 95,943/- कपात केलेली आहे.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा-प्र-5, दिनांक 22/02/2008 नुसार आहरण व संवितरण अधिका-यांनी वेळोवेळी आयकर अधिनियमातील तरतूदीनुसार कलम 192 प्रमाणे जे कर्मचारी आयकर कपातीस पात्र आहेत अशा कर्मचा-यांच्या वेतनातुन आयकराची रक्कम कपात करणे आवश्यक आहे. सदर कपात केलेली आयकराची रक्कम त्वरीत शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा-प्र-5, दिनांक 22/02/2008 मधील परिच्छेद 6 प्रमाणे कपात करण्यात येणा-या आयकरासाठी प्रत्येक आहरण व संवितरण अधिका-याने आयकर विभागाकडे प्रत्येक तीन महिन्याचे (दिनांक 15 जुलै, 15 ऑक्टोबर, 15 जानेवारी व 15 एप्रिल) आयकर वसुलीचे विवरणपत्र पाठविणे आवश्यक आहे. परंतु पंचायत समिती वाशीने तिमाही विवरणपत्रे आयकर विभागाकडे सादर केली नाहीत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 50 (2) नुसार पैशाच्या ज्या व्यवहारात कोणत्याही विभागाध्यक्षाचे किंवा परिषदेच्या अधीन असलेल्या इतर कोणत्याही दूय्यम प्राधिका-याचे

त्याच्या पदाच्या नात्याने संबंधित असे सर्व व्यवहार ताबडतोब आणि कोणतीही गोष्ट राखून न ठेवता नमुना नंबर 4 मधील किरकोळ रोख वहीत नोंदविणे आवश्यक आहे. परंतू अशी कार्यवाही केलेली नाही.

4) याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 12, दिनांक 26/09/2016 निर्गमित केले असता त्याबाबत कोणतेही अभिप्राय लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

**4.526 दिर्घ काळ विविध निधीची अखर्चित रक्कम पंचायत समिती स्तरावर ठेवल्याने झालेल्या नुकसानीबाबत.**

**पंचायत समिती अहमदपूर, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती अहमदपूर यांचेकडे महिनानिहाय तसेच योजना निहाय रक्कमेचा तपशील पंचायत समिती उपकर वगळता, एका वित्तीय वर्षात म्हणजे 12 महिन्याच्या कालावधीमध्ये सरासरी रक्कम पंचायत समितीकडे पडून असल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपनि/2009/पक्र5019/ वित्त 3, दिनांक 10/06/2009 मधील उपपरीच्चेद क्रमांक 2 नुसार विविध योजनांना वरील निधीच्या अल्प गुंतवणुकीद्वारे प्राप्त होणारी व्याजाची रक्कम हि जिल्हा परिषद उत्पन्नाची बाब समजण्यात येवून, जिल्हा परिषद उत्पन्नाच्या अर्थसंकल्पात 5 व्याज (2) शिल्लक रक्कमेच्या गुंतवणुकीवरील व्याज (अल्प मुदत) (अ) अल्पमुदतीत गुंतविलेल्या रकमेवरील व्याज या लेखा शिर्षाखाली जमा दाखवावे. व त्या रक्कमेचा विनियोग हा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार जिल्हा यादीमध्ये अंतर्भूत असलेल्या (पहिल्या अनुसूची) नमूद बाबीवर करण्यात यावा. अन्य कुठल्याही बाबीवर खर्च करू नये अशी तरतूद आहे. अशा प्रकरणी आवश्यक त्या शिल्लक रक्कमेचा ताळमेळ घेवून तातडीने कार्यवाही करणे बाबत सर्व सबंधित जबाबदार अधिकारी यांना सूचना देणे बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देशित केले आहे. विकास कामे व विकास योजनासाठी निधी खर्च केल्यानंतर शिल्लक राहिलेला निधी यांचा वेळोवेळी आढावा घेवून अल्प मुदतीच्या ठेवीच्या स्वरूपात गुंतवणूक करण्याबाबत शासनाच्या सूचना आहेत.तथापि वरील तपशिलानुसार पंचायत समिती अहमदपूर यांनी प्रदीर्घ कालावधीपासून विविध योजनांचा अखर्चित निधी पंचायत समिती स्तरावर ठेवण्यात आला आहे. उक्त निधी जिल्हा परिषदेस वेळीच वर्ग करण्यात आला असता तर जिल्हा परिषदेस (भ.नि.नि.) व्याजावर अनुज्ञेय असलेले सन 2015-16 मधील व्याज दर 8.07 टक्के ची रक्कम रुपये 61,78,520/- व्याज मिळाले असते व सदर व्याजाची रक्कम जिल्हा परिषद विकास कामासाठी वापरता आली असती. तथापि पंचायत समिती अहमदपूर यांना अशी प्रदीर्घ कालावधीपासून विविध योजनांची रक्कम गट स्तरावर अनावश्यक रित्या ठेवून घेतल्यामुळे जिल्हा परिषदेचे वित्तीय नुकसान झाले आहे.

**4.527 न वटलेल्या धनादेशाबाबत.**

**पंचायत समिती चाकूर, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती चाकूर येथिल सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरीक्षणात रोकडवही नमुना नं. 7 ची पडताळणी केली असता दिनांक 31/03/2016 अखेर गोषवाऱ्यात रक्कम रूपये 4,78,71,070/- अरोखीकृत धनादेश दिसून येतात. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 31(1) नुसार सहा महिन्यापेक्षा (वर्तमान काळात तिन महिने) जास्त काळ धनादेश विधीग्राहय राहाणार नाहीत. परंतु अशा धनादेशावर धनादेश काढणा-या दिनांकित स्वाक्षरीने तो पुन्हा विधीग्राहय करण्यात येतील. जर धनादेश काढल्यापासुन एक वर्षाच्या आत जर पुन्हा विधीग्रहय करण्यात आला नाही तर तो रद्द करुन त्याऐवजी नवीन धनादेश निर्गमीत करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 32 नुसार रद्द केलेले धनादेशाच्या स्थळप्रतीवर तशी नोंद घेवुन अभिरक्षेत ठेवणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 33 (2) नुसार वर्ष संपल्यानंतर धनादेश रदद करुन सदरील धनादेश जमा घेणे आवश्यक आहे. परंतू अशी कार्यवाही केलेली नसलेने पंचायत समिती, जिल्हा परिषद तसेच राज्य शासनाची रक्कम रुपये 4,78,71,070/- अडकून पडलेली दिसते.

3) कालबाहय धनादेशाच्या रक्कमा कशाच्या ? व का ? प्रलंबीत आहेत. याबाबत गटविकास अधिकारी यांनी नियमित आढावा घेऊन सदर धनादेश संबंधीतांकडून हस्तगत करुन पुन्हा रोखवहीमध्ये जमेस घेऊन रोखवही व बँक शिल्लक जुळविली पाहिजे. परंतु अशी कार्यवाही न करता रोखवही फरकाने लिहीली जाते. सदरची बाब नियमबाहय असून अशा फरकामुळे अपहारासारख्या गंभीर बाबी घडण्यास वाव मिळयाची शक्यता आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 27 नुसार पैसे घेणा-यास त्वरीत धनादेश देणे आवश्यक असल्याशिवाय किंवा पैसे त्वरित भरण्यांकरिता आवश्यक असल्या शिवाय कोणत्याही धनादेशावर स्वाक्षरी केली जाणार नाही, असे असताना पंचायत समितीने संबंधीत खात्यात त्या त्या वर्षात निधी नावे / जमा वेळीच न केल्याने निधीचे नुकसान झालेले आहे. तसेच शासकीय रक्कमा धनादेशाने, चलनाने भरणे आवश्यक असतांना त्या बाबीकडे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होते त्यांमूळे आयकर, व्यवसायकर, विक्रीकर इत्यादी सारख्या रकमांवर व्याज भरणे आवश्यक आहे त्यांमूळे धनादेश प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांचेकडून व्याज वसूल करुन शासकीय देणी तात्काळ भरणा करावी.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 31, 32, 33 व 34 नुसार उपरोक्त धनादेशांबाबतीत उचित कार्यवाही करुन नियमानुरुप पूर्तता अहवाल खुलाशासह दर्शवावा.

**4.528 बँक ताळमेळबाबत.**

**पंचायत समिती जळकोट, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती, जळकोट सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात हस्तांतरण, अभिकरण, पंचायत समिती उपकर, जिल्हा परिषद उपकर, ग्रामीण पाणी पूरवठा देखभाल व दूरुस्ती आणि 13 वा वित्त आयोग यांच्या निधीच्या बँक खाते व रोखवही यांचा ताळमेळ घेतला असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 57 प्रमाणे दैनिक तसेच मासिक जमा व खर्च संक्षेप नियम 55 व 58 अन्वये ठेवण्यात आलेल्या जमा खर्च नोंदवहया बरोबर ताडून पाहण्यात यावेत आणि रोखवहीत येणाऱ्या मासिक अखेर शिल्लकेशी पडताळणी करण्यात यावी. येणारा फरक काढून टाकण्यासाठी सत्वर आणि प्रभावी उपाय योजण्यात यावेत अशी स्पष्ट तरतूद असतानाही बँक ताळमेळ घेणे बाबत अशी कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते. उचित कार्यवाही करुन पूर्तता दर्शवावी.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 27 प्रमाणे रक्कम तात्काळ प्रदान करणे आवश्यक असल्याशिवाय धनादेशांवर स्वाक्षरी करता येत नाही व धनादेशाचे वितरण करता येत नाही. अशी स्पष्ट तरतूद असतांना पंचायत समितीने धनादेश / RTGS काढून ठेवले आहेत. तसेच जिल्हा परिषदेने दिलेले अनुदान वित्तप्रेषण बँकेत जमा होण्यांपूर्वी जमा-खर्च नोंदविला आहे. सदरची कृती नियमबाहय असून खुलासा होणे आवश्यक आहे.

3) दरवर्षीचे लेखापरीक्षण अहवालात बँक ताळमेळ घेऊन फरक निरंक करण्याबाबत सूचित करुनही त्याबाबत गांभीर्याने व प्रभावी उपाय योजना केली नसल्याचे दिसून येते. सन 2015-16 मध्ये पुढे दर्शविलेल्या सर्व बँक खात्यांतील फरक निरंक करुन अनुपालन दर्शवावे.

4) अखर्चित रकमा त्वरित शासन खाती भरणा करणे बाबत शासनाने वेळोवेळी निर्देश देवूनही मोठया प्रमाणात रकमा रोखवहीत शिल्लक ठेवण्यात येत असल्याने ताळमेळ घेण्याचे काम क्लीष्ट होऊन चुका संभवत आहेत. त्यांमूळे अखर्चित रकमा वेळीच परत करुन व अनावश्यक चुका टाळून पुर्तता दर्शवावी. अखर्चित रक्कमा भरणा केलेचे दर्शवावे. बँक ताळमेळ घेऊन प्रारंभिक तपासणीचे काम सन 2015-16 मध्ये झाले नसल्याचे स्पष्ट होते. यांबाबत खुलासा करुन उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

5) अनेक मासिक बँक ताळमेळ पत्रकांवर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. यांबाबत खुलासा होऊन पूर्तता दर्शवावी.

6) ठेविबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 222 ते 224 प्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही. नमुना नं. 84 मध्ये नोंदवही ठेवण्यांत आलेली नसलेने उक्त मुदतबंद ठेव कोठे व किती कालावधिकरिता ठेवली होती, ठेवीवर किती व्याज देय होते व किती मिळाले, मुळ रक्कम केव्हा जमेस घेतली इत्यादी बाबतच्या तपशिलाचे लेखांकन लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही यांबाबतचा खुलासा होऊन पूर्तता अहवाल दर्शवावा.